संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तिहेरी संघर्षाचे तिहेरी संकट

**गेले** दोन आठवडे सुरू असलेले इराण विरुद्धचे अमेरिका आणि इस्त्रायलचे युद्ध सहजासहजी थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इराणमधली निम्मी महत्त्वाची स्थळे उद्ध्वस्त झाली असताना विशेष म्हणजे या देशाची सत्तेची सूत्र ज्यांच्या हाती होती. त्या आयातउल्ला खामेनींची हत्या, प्रमुख लष्करी अधिकारी ठार होण्याचा प्रकार अशा इराणला हतबल करणाऱ्या घटना घडल्या असूनही इराणने माघार घ्यायला नकार दिलेला दिसतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लवकरच युद्ध थांबेल असा दावा केला असताना इराणने मात्र तीन अटी घालून युद्ध थांबवण्याची तयारी दाखवली. परंतु या तीन अटी अमेरिका मान्य करण्याची शक्यता नाही. म्हणूनच युद्ध पूर्णपणे थांबण्याची तूर्त तरी शक्यता दिसत नाही. अमेरिका, इराण आणि इस्त्रायल या तिघांमधले हे युद्ध जगाच्यादृष्टीने तिहेरी संकट निर्माण करणारे युद्ध म्हणावे लागते. अमेरिकेला इराणमध्ये सत्तांतर घडवून आणायचे आहे. तिथले सरकार दहशतवादी प्रवृत्तीचे आहे. इराणने आपला अणूकार्यक्रम पूर्णपणे थांबवावा आणि इराणमध्ये लोकशाहीपूरक नवे सरकार यावे असा अमेरिकेचा प्रयत्न आहे. परंतु अमेरिकेच्या तीनही अपेक्षा प्रत्यक्षात येऊ शकलेल्या नाहीत. आयातउल्ला खामेनींच्या हत्येनंतर सत्तेची सूत्रे त्यांचे पूत्र मोजतबा खामेनी यांच्याकडे आलेली आहेत. तिथल्या राजकारणामध्ये इराणचे सर्वोच्च नेते हेच प्रमुख असतात आणि तेच लष्करी राजकीय आणि धर्मविषयक निर्णय घेत असतात. ज्याअर्थी आयातउल्लांच्या मुलाची निवड झाली. त्याअर्थी इराणमध्ये अजूनही या खामेनी घराण्यालाच लोकांचा कौल दिसतो. विशेषतः अमेरिकेने शाळेवर केलेल्या हल्ल्यात दीडशेपेक्षा जास्त शाळकरी मुले ठार झाली. ही या युद्धातली सर्वात मोठी घोडचूक ठरते. स्वाभाविकपणे इराणमध्ये अमेरिकेविरुद्ध खूप मोठा संताप आहे. युद्धाचे जे संकेत आणि नियम असतात. त्यालाही धाब्यावर बसवून अमेरिकेने केलेले हल्ले म्हणजे केवळ आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा आटापीटाच ठरतो.यामुळेच तिथे सत्तांतर घडवणे सोपे राहिलेले नाही.

### इराणमध्ये सत्तांतराची शक्यता नाही

इराणची सूत्रे मोजतबा खामेनी यांच्याकडे आल्यानंतर ते तडजोडीची भूमिका घेतील अशी अमेरिकेला अपेक्षा होती. परंतु तसे झालेले नाही. उलट इराणने तीन अटी टाकून अमेरिकेलाच एकाअर्थी चेकमेट दिलेले आहे. या तीन अटींमध्ये इराणचे हक्क अबाधित होण्याचे आश्वासन युद्धातील नुकसानीची भरपाई आणि भविष्यात अमेरिका आक्रमण करणार नाही अशा प्रकारचे आश्वासन इराणला हवे आहे. त्यातली एकही अट अमेरिका मान्य करणार नाही. म्हणूनच कोणत्याही मोठ्या निष्कर्षाशिवाय हळुहळू युद्धाचा प्रभाव कमी करण्याशिवाय अमेरिका आणि इस्त्रायलला पर्याय उरणार नाही असे दिसते. मात्र इराणने जर अमेरिकी तळे उद्ध्वस्त करण्याचा सपाटा चालूच ठेवला तर मात्र यापूर्वी झालेल्या हल्ल्यांपेक्षाही अधिक तीव्र हल्ले अमेरिका आणि इस्त्रायलकडून होऊ शकतात. या तीन देशांच्या दुहेरी संघर्षात जागतिक पातळीवर तिहेरी समस्या निर्माण झालेली आहे. एक म्हणजे इराणने इतर आखाती देशांवर हल्ले केल्याने इंधन उत्पादनावर मोठा परिणाम झालेला आहे. अनेक देशांमध्ये इंधन तुटवडा जाणवतो आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेसह सगळ्याच मोठ्या देशांना आर्थिक फटका बसू लागलेला आहे. युद्धाचा हेतू साध्य होत नसल्याने जागतिक पातळीवर मोठी अस्थिरताही दिसून येते आहे. अगदी अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनीसुद्धा ट्रम्प यांनी युद्धाचा हेतू साध्य केला नसल्याचे म्हटले आहे. तिथे सत्तांतर घडवणे हे अधिक महत्त्वाचे होते. परंतु त्याऐवजी अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले आणि युद्धाला नवे वळण लागल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः आखाती देशांना या युद्धात नेमकी भूमिका घेता येणे अशक्य झाले आहे. सौदी अरेबिया, कतार, बहारिन, हे तुलनेने छोटे देश असल्याने त्यांच्यात तेल उत्पादनावर गंभीर परिणाम झालेले आहेत. अनपेक्षितपणे इराणने याही देशांना टार्गेट केल्याने युद्धाची दिशाच बदलल्याचे सांगितले जाते. स्वाभाविकपणे अमेरिकेची बाजू घेणाऱ्या देशांना इंधन टंचाईचा सामना करावा लागतो आहे.

### कृत्रिम टंचाईचा प्रयत्न

भारतासारख्या मोठी अर्थव्यवस्था आणि लोकसंख्या असलेल्या देशाची देखील याच कारणामुळे अडचण झाली. विशेषतः तेल आणि अन्न व्यापारासाठी पश्चिम आशियातले हरमूज सामुद्रधुनी ही फार महत्त्वाची ठरते. जगातला समुद्री व्यापार याच मार्गाने मोठ्या प्रमाणावर होतो. इराणच्या हद्दीमध्ये येणारी ही सामुद्रधुनी बंद करण्याचा इशारा इराणने वारंवार दिलेला आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब एवढीच आहे की, भारताने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन हरमूज बंदरातले भारतीय ध्वज असलेली जहाजे सुखरूप राहातील याची ग्वाही इराणने दिलेली आहे. अत्यंत धोकादायक आणि अशांत वातावरण असताना तिथे अडकलेली भारतीय जहाजे आता परतायला सुरूवात झालेली आहे. त्यातले एक जहाज भारतात येऊनही पोहचले आहे ज्यात मोठ्या प्रमाणात इंधनसाठा आहे. भारतात गॅस किंवा तेलटंचाई नाही, तीस दिवस पुरेल इतका साठा आहे, असे सरकारतर्फे सांगितले जाते. दुर्दैवाने या तिहेरी संघर्षाचा चौथाच घटक फायदा उठवण्याचाही प्रयत्न करतो आहे. काही देश युद्धाचे कारण सांगून वस्तूंच्या किमती वाढवत आहेत आणि भारतातही साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न होतो आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल, डिझेल आणि गॅस टंचाईच्या अफवा मोठ्या प्रमाणावर पसरवल्या. गेल्या काही गॅस एजन्सीजनेसुद्धा काळाबाजार करण्याचा प्रयत्न केला. अनावश्यक भीती निर्माण करून नफा कमावण्याचा उद्योग देशातले काही घटक करीत आहेत. येणाऱ्या महिनाभरामध्ये थोडीफार टंचाईसदृष्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. परंतु तीदेखील परिस्थिती येऊ नये म्हणून भारताने थेट इराण सरकारशी संपर्क साधून भारताचा तेलपुरवठा अबाधित राहील यासाठी आश्वासन मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच या सगळ्या परिस्थितीत या तिहेरी संघर्षात भारत भरडला जाणार नाही याची काळजी अत्यंत महत्त्वाची ठरते.